# बृहन्मुंबई महानगरपालिका
## दुकाने व आस्थापना
## परिपत्रक
### क्र. प्र.अधि./ ९३८ / दु. व आ. दि.१०.०५.२०२२

विषयः बृहन्मुंबई हद्दीतील सर्व दुकाने आणि आस्थापनांचे नामफलक (पाट्या) मराठी भाषेत असणेबाबत..

महाराष्ट्र दुकाने व आस्थापना (नोकरीचे व सेवाशर्तीचे विनियमन) सुधारित अधिनियम, २०२२ दि. १७.०३.२०२२ कलम ३६क(१) व (२) नुसार "सर्व दुकाने व आस्थापनांचे नामफलक मराठी भाषेमध्ये सुरुवातीलाच लिहीणे आवश्यक असेल आणि मराठी भाषेतील अक्षरांचा टंक आकार, इतर कोणत्याही भाषेतील अक्षरांच्या टंक आकारापेक्षा लहान असणार नाही. ज्या आस्थापनांमध्ये मद्य पुरविले जाते किंवा विकले जाते, अशी आस्थापना, नामफलकावर महान व्यक्तींची किंवा गड किल्ल्यांची नावे लिहिणार नाहीत." अशी तरतूद करण्यात आली आहे.

त्यायोगे खालीलप्रमाणे कार्यपध्दतीचा अवलंब करण्यात येईल -

1. दुकाने व आस्थापनांच्या मालकांना कलम कलम ३६क (१) व (२) नुसार "कलम ६ अन्वये नोंदणी केलेल्या प्रत्येक आस्थापनेचा किंवा ज्या आस्थापनेला कलम ७ लागू आहे त्या प्रत्येक आस्थापनेचा नामफलक, देवनागरी लिपीतील मराठी भाषेमध्ये सुरुवातीलाच लिहीणे आवश्यक असेल आणि मराठी भाषेतील अक्षरांचा टंक आकार, इतर कोणत्याही भाषेतील अक्षरांच्या टंक आकारापेक्षा लहान असणार नाही. ज्या आस्थापनांमध्ये मद्य पुरविले जाते किंवा विकले जाते, अशी आस्थापना, नामफलकावर महान व्यक्तींची किंवा गड किल्ल्यांची नावे लिहिणार नाहीत." अशा पध्दतीने **'नामफलक'** प्रदर्शित करण्यात यावे.
2. बृहन्मुंबई महानगरपालिका हद्दीतील सर्व आस्थापनांना वरीलप्रमाणे अधिसुचनेनुसार नामफलकात आवश्यक तो बदल करण्यासाठी दि.३१.०५.२०२२ पर्यंत कालावधी देण्यात येत आहे.
3. ज्या आस्थापनांमध्ये मद्य पुरविले जाते किंवा विकले जाते, अशा आस्थापनांच्या नामफलकावर महान व्यक्तींची किंवा गड किल्ल्यांची नावे असल्यास वरीलप्रमाणे अधिसुचनेनुसार नामफलकात आवश्यक तो बदल करण्यासाठी शासन निर्णय क्र. बीपीए १११७/प्र.क्र.२४९/राउशु-२ दि.०७.०४.२०२२ नुसार दि.३०.०६.२०२२ पर्यंत कालावधी देण्यात आलेला आहे.

(कृ.मा.प.)

४. ज्या आस्थापनांमध्ये मद्य पुरविले जाते किंवा विकले जाते, व अशा आस्थापनांच्या नामफलकावर महान व्यक्तींची किंवा गड किल्ल्यांची नावे नाहीत. परंतु, वरील 1 मधील अधिसुचनेत नमुद केल्याप्रमाणे इतर बाबींची पुर्तता करण्यासाठी दि.३१.०५.२०२२ पर्यंत कालावधी देण्यात आला आहे.

५. सर्व विभागीय सहाय्यक आयुक्त यांनी वरील 1 मध्ये नमूद केल्याप्रमाणे नामफलक लावण्याबाबत विभागीय कार्यालयाच्या प्रवेशव्दारावर तसेच गर्दीच्या ठिकाणी नामफलकाच्या दृष्टीने जनजागृती होण्यासाठी फलक लावावेत व त्याचा अहवाल प्रमुख अधिकारी, दुकाने व आस्थापना यांना सादर करावा.

६. तसेच विभागीय कार्यालयातील व्यापारी संघटनांचे सदस्य, तसेच आस्थापनांचे मालकांची बैठक घेऊन सदर कलम ३६क(१) व (२) ची अंमलबजावणीबाबत मार्गदर्शन करण्यात येईल.

(सुसतोषी) 10.5.22
प्रमुख अधिकारी
दुकाने व आस्थापना

उप आयुक्त
(विशेष)

प्रत :-
सहाय्यक आयुक्त ए ते टी विभाग
माहितीकरीता व आवश्यक कार्यवाहीकरीता अग्रेषित

(सुसतोषी) 10.5.22
प्रमुख अधिकारी
दुकाने व आस्थापना

प्रत :-
वरिष्ठ सुविधाकार दुकाने व आस्थापना
ए ते टी विभाग
माहितीकरीता व आवश्यक कार्यवाहीकरीता अग्रेषित.

(सुसतोषी) 10.5.22
प्रमुख अधिकारी
दुकाने व आस्थापना